www.rajdand.com
सातारा सोमवार
१९. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची



छत्रपती शिवाजी महाराज
जयंती निमित्त विनम्र अभिवादन

# राजकारणासाठी व्यक्तिगत नाते तोडू नये

## काँग्रेसमधील 'काका-पुतण्या'च्या नात्यावर जयंत पाटलांचे विधान!



**मुंबई :** गेल्या काही वर्षात राज्यात काका-पुतण्यांचे राजकारण अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. अजित पवारांनी राष्ट्रवादीत बंड केल्यानंतर या काका-पुतण्याच्या राजकारणाने पुन्हा एकदा तोंडवर काढलं. यावरूनच, शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी यावरून टीका केली आहे. आज राज्याचे माजी मुख्यमंत्री विलास देशमुख यांच्या पुतळ्याच्या अनावरणाच्या कार्यक्रमात बोलत होते.

''एखाद्यावर संताप व्यक्त करण्यासाठी खालच्या दर्जाला राजकारण गेलं आहे. त्यामुळे आता कुठेतरी थांबलेलं बरं असं अनेकांना वाटतं. किती गुंडगिरी महाराष्ट्रातील राजकारणात शिरते आहे, याची अनेक उदाहारणं गेल्या काही महिन्यांत दिसायला लागली आहेत. माझी लातूरकरांना विनंती आहे की, या लातूरने महाराष्ट्रातील काँग्रेसला सतत तेज देण्याचं काम केलं आहे. काँग्रेस महाराष्ट्रात ठामपणे अस्तित्वात आहे, हे अनेकवेळा या लातूरने सिद्ध करून दाखवलं आहे. लातूरकरांवर ही जबाबदारी आहे की आपल्या महाराष्ट्रात ज्या संस्कृतीत वाढलो, जी संस्कृती विलास देशमुखांनी दाखवली, ती संस्कृती लोप पावत आहे. या लोप पावणाऱ्या या संस्कृतीला टिकवण्याचं काम लातूरकरांचं आहे'',असं भावनिक आवाहन जयंत पाटलांनी केलं.

''काँग्रेसमधील दिलीप देशमुखांच्या मागे सक्षम आणि खंबीरपणाने राहणारा नेता अमित देशमुखांच्या रुपाने भेटला आहे. पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांच्या पीढीच्या नंतरची पिढी म्हणून सतेज पाटील आहेत'', असंही जयंत पाटील म्हणाले.

''आज विलासराव देशमुख असते तर काँग्रेस अधिक संपन्न आणि सामर्थ्यवान झाली असती. विलासरावांनी सक्षम आणि भक्कम काँग्रेस महाराष्ट्रात उभी होती. काँग्रेस विलासरावांच्या नेतृत्त्वामुळेच होती. विलासराव देशमुखांना महाराष्ट्रातील खडान् खडा माहिती होती'', असंही ते म्हणाले.

''लोक एखाद्या व्यक्तीला त्यांनी केलेल्या चांगल्या कामामुळे स्मरणात ठेवतात. विलासराव देशमुख साहेब यांनी मराठवाड्यासाठी आणि संपूर्ण राज्यासाठी विस्तृत काम केले आहे. आटपाडीच्या साखर कारखान्याच्या उद्धाटनप्रसंगी ते आले होते. तेव्हा त्यांचे भाषण पहिल्यांदा ऐकलं. राजकारण्याने कसे भाषण करावे हे विलासरावांकडून शिकले पाहिजे.

मी त्यांच्या मंत्रिमंडळात अधिकतम काम केले आहे. त्यामुळे त्यांचे आणि माझे घनिष्ट ऋणानुबंध होते. त्याकाळी फार वेगळे राजकीय संस्कार आम्ही अनुभवले. म्हणून महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर नेऊ शकलो. आज स्व. विलासराव देशमुख साहेब असते तर काँग्रेसच्या संकटाच्या काळात उभे ठाकले असते. आज राज्यातील काँग्रेस भक्कम पाय रोवून उभी आहे ती विलासराव देशमुख साहेबांमुळे'', असे कौतुकग्दारही त्यांनी उद्गारले.

### काँग्रेससाठी काका-पुतण्याचं नातं धार्जिणं

**''काँग्रेसचं बरं आहे काका-पुतण्याचं नातं धार्जिणं दिसत आहे. दिलीप देशमुख उत्तमपणाने नेतृत्त्व करत आहेत. अमित यांच्यासह सर्वाचे संबंध मधूर आहेत. राजकारणात कसंही कोणी वागलं तरी चालतं. पण राजकारणासाठी व्यक्तिगत नातं तोडण्याची भूमिका कोणी घेता कामा नये. आता त्याही गोष्टी व्हायला लागल्या आहेत'', असा अप्रत्यक्ष टोलाही त्यांनी लगावला.**

# घाऊकमध्ये लसूण उतरला; मात्र किरकोळमध्ये महागच!

**नागपूर :** भाजीच्या चवीसाठी असलेली लसणाची फोडणी सध्या चांगलीच कडाडली आहे. घाऊकमध्ये भाव २०० रुपयांपर्यंत उतरल्यानंतरही किरकोळ विक्रेते ४०० ते ४५० रुपये किलो दराने विक्री करीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट बिघडले आहे. कळमन्यात चार दिवसांपासून पुरवठा वाढल्याने उत्तम दर्जाच्या लसणाची २०० ते २५० रुपये किलो दराने विक्री होत आहे. सध्या दररोज १२० टन लसणाचा पुरवठा होतो, हे विशेष.

दरवाढीमुळे स्वयंपाकात वापरल्या जाणाऱ्या लसणाची जागा डिसेंबरपासून कमी झाल्याचे दिसत आहे. गावराण लसूण चारशेच्या पार गेल्याने ग्राहकांना परवडेना, अशी स्थिती आहे. नागपुरातील बहुतांश किरकोळ बाजारात डिसेंबरपासून लसणाच्या किमती चारपटीने वाढल्या. त्यामुळे किरकोळमध्ये दराने किलोमागे ४०० रुपयांचा टप्पा ओलांडला. विक्रेत्यांच्या मनमानी दरवाढीवर नियंत्रण आणण्याची ग्राहकांची मागणी आहे.

लसणाच्या दरवाढीमुळे अनेक हॉटेल आणि घरांमध्ये लसणाची चटणी आणि लसणाचे पदार्थ मेनूमधून काढून टाकण्यात आले. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार नवीन पीक बाजारात येईपर्यंत भाव चढेच राहतील. पण आता आवक वाढताच भाव कमी झाले. त्यानंतरही किरकोळमध्ये ग्राहकाला ४०० ते ४५० रुपये किलो दरानेच लसूण खरेदी करावे लागत आहे. ऐन दिवाळीतही लसूण महागल्याने सामान्यांना थोडी महागाई सोसावी लागली होती.

खराब हवामानाचा फटका लसणासोबत अद्रक पिकालाही बसला. कळमना घाऊक बाजारात १०० रुपये किलोवर पोहोचलेले अद्रकाचे दर ८० ते ९० रुपयांपर्यंत कमी झाले. मात्र, किरकोळमध्ये २०० रुपये किलो दर आहेत.

### लसणाचे दर का वाढले?

**प्रतिकूल हवामान आणि अवकाळी पावसाचा फटका पिकांवर पडला. खराब हवामानामुळे मुख्यत्त्वे लसणाचे पीक खराब झाले आणि दर वाढले. त्यामुळे व्यापाऱ्यांसह ग्राहकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. ग्राहकांनीदेखील पाठ फिरवली. रोजच्या जेवणामध्ये महत्वाचा घटक असणाऱ्या लसणाचे दर असेच राहिले तर खायचे काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे.**

## महत्त्वाचे

### कांद्यावरील निर्यात बंदी उठवली

**मुंबई :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात बंदी उठवली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री भारती पवार यांनी दिली. मात्र याबाबतचे नोटिफिकेशन अद्याप जारी करण्यात आलेले नाही. शेतकऱ्यांना काहीसा दिसाला मिळाला असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना किती प्रमाणात कांदा निर्यात करता येईल हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

कांद्यावरील निर्यात बंदी उठवली असली तरी नोटीफिकेशन जारी करण्यात आलेले नाही. नोटिफिकेशन जारी झाल्यानंतर किती प्रमाण कांदा निर्यातीला मंजुरी देण्यात आलीय याबाबत स्पष्टता येईल असेही भारती पवार यांनी सांगितले. तर, सरकारने कांद्यावरील बंदी उठवण्यास खूप उशीर केला असा टोला राष्ट्रवादी पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी लगावला आहे.

**भारती पवार यांची प्रतिक्रिया**

केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात बंदी हटवल्यानंतर केंद्रीय मंत्री भारती पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. पंतप्रधान मोदी कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहतात. त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा केला. अमित शाह यांच्यासोबत आज मीटिंग झाली होती त्यानंतर कांदा निर्यात खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेला मोठा निर्णय आहे.

# चिन्ह गेले तरी अस्तित्व संपत नाही

## मेनिव्या जोमाने संघटना बांधू शरद पवार यांचा कार्यकर्त्यांसमोर निर्धार

बारामती : पक्ष स्थापन करणाऱ्याचा पक्ष ताब्यात घेतला, यापूर्वी देशात कधी असे झाले नव्हते, मात्र संघटनेचे चिन्ह किंवा पक्ष गेल्यामुळे अस्तित्व संपत नाही, पुन्हा नव्या जोमाने आपण राज्यात संघटना बांधणार असून या माध्यमातून नव्या जोमाने जनतेपर्यंत पोहोचू, असा निर्धार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बोलताना व्यक्त केला. आपण सर्वोच्च न्यायालयात यासंदर्भात गेलो आहोत, त्या ठिकाणी योग्य निकाल लागेल असा विश्वास देखील त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. बारामतीतील गोविंद बाग या त्यांच्या निवासस्थानी माळशिरस तालुक्यातील काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात प्रवेश केला, त्यावेळी शरद पवार यांनी कार्यकर्त्यांचे स्वागत करून मार्गदर्शन केले. यापूर्वी देशामध्ये अनेकदा पक्षाच्या संदर्भात घडामोडी घडल्या, ज्याने पक्ष स्थापन केला त्याचाच पक्ष काढून घेणे हे कायद्याला धरून वाटत नाही, त्यामुळेच आम्ही सर्वोच्च न्यायालयात गेलो आहे. त्याचा योग्य निकाल लागेल अशी अपेक्षा आहे. चिन्हाची फार चिंता करायची नाही, आजपर्यंत मी १४ वेळा निवडणुका लढलो. त्यापैकी पाच निवडणुकांचे चिन्ह हे बैलजोडी, गाय वासरू, चरखा, हाताचा पंजा व घड्याळ अशी होती. मात्र चिन्ह काढून घेतलं म्हणजे त्या संघटनेचा अस्तित्व संपेल, असे कधी घडत नाही. सामान्य माणसाशी संपर्क कायम वाढला पाहिजे, त्याला पण नव्याने काय देऊ शकतो यावर विचार केला पाहिजे, यावर माझा विश्वास आहे. त्यामुळे नव्याने वाटचाल करताना देखील फार अडचणी येणार नाहीत, असा विश्वास शरद पवार यांनी कार्यकर्त्यांच्या समोर बोलून दाखवला. आपण नव्या उमेदीने महाराष्ट्रात फिरून लोकांशी संपर्क साधून लोकांना भूमिका पटवून देणार आहोत. महाराष्ट्रातील जनता आपल्या या नव्या भूमिकेचे निश्चित स्वागत करेल, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

# हिंमत असेल राजीनामा द्या; तुमच्याविरुद्ध निवडणूक लढतो

## आदित्य ठाकरेंचे मुख्यमंत्री शिंदेंना ठाण्यातून आव्हान





**ठाणे:** हिंमत असेल तर राजीनामा द्या, तुमच्याविरुद्ध ठाण्यातून निवडणूक लढतो, असे खुले आव्हानच शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदारआदित्य ठाकरेयांनी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांना रविवारी दिले. ठाण्यातील घोडबंदर भागात त्यांनी शिवसेना शाखांना भेटी दिल्या. त्यावेळी आपल्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.- उत्तएठढखडएचएछढअमावस्या आणि पोर्णिमेलाच मुख्यमंत्री शिंदे हे आपल्या गावी शेती करायला जातात. ते चंद्राच्या प्रकाशात कशाची शेती करतात? असा टोलाही त्यांनी यावेळी लगावला. त्यांच्या गावी जायला रस्ताही नाही. पण दोन दोन हेलिकॉप्टर्स त्यांच्या शेतात उतरतात. असे हे राज्यातील गरिब शेतकरी असल्याचा मिश्कील टोलाही त्यांनी लगावला.यावेळी मुख्यमंत्र्यांसह राज्य सरकारवर युवासेनाप्रमुखआदित्य ठाकरेयांनी सडकून टीका केली. ते म्हणाले राज्यात एकही रोजगार नाही. नवा उद्योग नाही. लहान लहान दुकानांवर नाहक कारवाई केली जाते. पण केंद्र सरकारकडून जीएसटीचा पैसा आणण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत. राज्यात असे हे अवकाळी सरकार डोक्यावर बसविले आहे.उद्धव ठाकरेंनी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिली. नगरविकास खात्यासाठी शिंदे मातोश्रीवर रडल्याचीही त्यांनी आठवण करुन दिली. शिंदेना मंत्रालयात मोकळा हात दिला. मात्र, ईडी आणि आयटीमधून वाचण्यासाठीच उद्धव ठाकरेंवर शस्त्रक्रीया झाल्या त्याच काळात त्यांनी पाठीत खंजीर खुपसल्याचा पुनरुच्चारही आदित्य यांनी यावेळी केला. पहिल्या तिकीटापासून ते मंत्री होण्यापर्यंत सर्व काही दिले. तरी पक्ष चोरल्याचा आरोपही त्यांनी केला. ठाण्यात आणि राज्यात गुंड आणि कॉन्ट्रॅक्टर यांचेच पोस्टर दिसतात, असंही ते म्हणाले.

या सरकाने हिंमत दाखवली असती तर ठाण्यासह इतर महापालिकांची निवडणूक घेतली असती.भाजपने २०२२ मध्ये शिवसेना फोडली. २०२३ मध्ये राष्ट्रवादी आणि आता २०२४ मध्ये काँग्रेस फोडण्याचा प्रयत्न सुरु असल्याचेही ते म्हणाले. देश आणि महाराष्ट्र हिताचे आपले हिंदुत्व असून संविधानाच्या संरक्षणासाठी ठाणेकरांनी साथ देण्याचे भावनिक आवाहनही त्यांनी केले.

### पंजाबमध्ये काँग्रेस-आप स्वंतत्रपणे लढणार

**दिल्ली :** लोकसभेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर आली आहे. कोणत्याही क्षणी या निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता असून विरोधकांच्या इंडिया आघाडीत त्यासाठी जागावाटपावर चर्चा चालू आहे. पंजाब राज्यात मात्र आम आदमी पार्टी (आप) आणि काँग्रेस यांच्यात अद्याप एकमत झालेले नाही. असे असताना याच जागावाटपावर आपचे सर्वे सर्वा अरविंद केजरीवाल यांनी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. पंजाबमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लडवण्यावर काँग्रेस आणि आमच्यात एकमत झाले आहे, असे केजरीवाल म्हणाले आहेत.

अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसचे महत्त्वाचे नेते अभिषेक मनू सिंघवी यांच्या घरी जाऊन भोजन केले. त्यानंतर केजरीवाल यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. ''काँग्रेस आणि आपने पंजाबमध्ये स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचे ठरवले असून यावर आमचे एकमत झाले आहे, आमच्यात कोणतेही वैर नाही,'' असे केजरीवाल म्हणाले.

काँग्रेस आणि आप हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत. मात्र पंजाब राज्यात ते एकमेकांचे विरोधक आहेत.

# हजारो मशालींनी उजळून निघाला किल्ले अजिंक्यतारा

## लेजर शोने शहर निघाले न्हाऊन



**सातारा-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आ. श्रीमनी छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, रविवारी रात्री किल्ले अजिंक्यतारावर मशाल महोत्सव आणि लेजर शोचे आयोजन करण्यात आले. यामुळे किल्ले अजिंक्यतारा हजारो मशालींनी उजळून निघाला तर सातारा शहर लेजर शोच्या प्रकाशात न्हाऊन निघाले.

आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मार्गदर्शनाखाली शिवजयंती महोत्सव समिती यांच्यावतीने रविवारी किल्ले अजिंक्यतावर मशाल महोत्सव, सुनील लाड (कवलापूर, सांगली) यांचे व्याख्यान आणि विविध संस्था व व्यक्तींचा सन्मान सोहळा उत्साहात झाला. या कार्यक्रमाला आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, अनेक मान्यवर, असंख्य कार्यकर्ते आणि हजारो शिवप्रेमी उपस्थित होते. रात्री सातच्या सुमारास युवक व युवतींचे जथ्थेच्या जथ्थे हातात मशाली घेऊन गडावर आले. गडावर सर्वत्र हे मावळे हातात मशाल घेऊन उभे राहिले. यानंतर एक- एक मशाल पुटु लागली आणि हजारो मशाली गडाच्या सर्व तटबंदीवर पेटल्या. यामुळे अजिंक्यतारा उजळून निघाला.

किल्ल्यावरून सातारा शहरावर लेजर शो टाकण्यात आला. यामुळे सातारा शहर वेगवेगळ्या रंगाच्या प्रकाशात न्हाऊन निघाले. गडावरील राज सदरेवर व्याख्याते सुनील लाड यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम उत्साहात झाला. लाड यांनी छत्रपती शिवरायांच्या विविध पराक्रम आणि कार्याचा लेखाजोखा व्याख्यानात मांडला. यावेळी कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध संस्था आणि व्यक्तींचाही सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आज शाही मिरवणूक आणि महाआरती

दरम्यान, सोमवारी शिवजयंती दिनी सायंकाळी ४.३० वाजता राजवाडा, गांधी मैदान येथून महोत्सव समितीच्या वतीने शिव प्रतिमेची भव्य शाही मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत हत्ती, घोडे, उंट, विविध चित्ररथ सहभागी होणार आहेत. शिवतीर्थ पोवई नाका येथे मिरवणुकीची सांगता होणार असून रात्री ८.३० वाजता शिवतीर्थावर छत्रपती शिवरायांची महाआरती होणार आहे. तसेच यावेळी फटाक्यांची आकर्षक आणि नयनरम्य आतिषबाजी केली जाणारा आहे. मिरवणूक आणि महाआरतीसाठी सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी महोत्सव समितीच्या वतीने केले आहे.

# बारामतीमध्ये सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे असा रंगू शकतो सामना

**बारामती :** बारामती लोकसभा मतदार संघात मोठी राजकीय उलथापालथ सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसमध्येफूट पडल्यानंतर खासदार सुळे यांनी मतदार संघात लक्ष केंद्रित करत भेटीगाठी सुरू केल्या.महत्त्वाचे म्हणजे, महिलांकडे अधिक लक्ष दिले. त्यासाठी त्यांनी हळदी-कुंकू समारंभ, अंगणवाडी सेविकांचा कार्यक्रम यांसह अन्य कार्यक्रम घेतले. इतकेच नाही तर त्यांनी भोरचे आमदार संग्राम थोपटे यांच्या निवासस्थानी जाऊन चर्चा केली. इतक्या वर्षात पहिल्यांदाच त्या थोपटेंना घरी जाऊन भेटल्याने संपूर्ण जिल्ह्यात उलटसुलट चर्चा सुरू झाली. दुसरीकडेअजित पवारगटाकडे उमेदवार नाही, असे वारंवार बोलले जात होते. जिल्ह्यातील भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी थेट वरिष्ठांना बारामती लोकसभा मतदार संघाचा अहवाल दिला. त्यात बारामतीमध्ये उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्या पत्नी सुनेत्रा पवार उमेदवार असतील तरच खा. सुप्रिया सुळे यांचा पराभव अटळ असल्याचे म्हटले होते. त्यामुळे भाजपकडून अजित पवारांवर दबावतंत्र वापरण्यात येत होते. अखेर गेल्या काही दिवसांपासून बारामती लोकसभा मतदार संघात सुनेत्रा पवार यांनी गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली. तसे बॅनरही काही ठिकाणी झळकले आहेत.आमदार कुल कुटुंबीयांची भेटउमेदवारी जाहीर झाली नसली तरी सुनेत्रा पवार थेट रिंगणात उतरल्या आहेत. त्यांनीही हळदी- कुंकूसारखे कार्यक्रम घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी केलेल्या कामांची माहिती पोहोचवण्यासाठी संपूर्ण मतदार संघात चित्ररथ फिरवले जात आहेत. दौंडमध्ये जाऊन आमदार राहुल कुल कुटुंबीयांची देखील त्यांनी भेट घेतली आहे.वरिष्ठांच्या पोटी जन्माला आलो असतो तर... अजित पवार यांनी नुकतीच लोकांना भावनिक साद घातली आहे. परिवार सोडला तर सगळे कुटुंबीय विरोधात आहेत, वरिष्ठांच्या पोटी जन्माला आलो असतो तर राष्ट्रीय अध्यक्ष झालो असतो, पक्ष ताब्यात आला असता, पण तुमच्या सख्ख्या भावाच्या पोटी जन्मलो ना, अशा शब्दात अजित पवारांनी आपली भूमिका मांडली. अजित पवारच नव्हे तर सुनेत्रा पवार यांनीही गाठीभेटी दरम्यान, आतापर्यंत साथ दिली, तशीच पुढेही साथ राहू द्या, असे आवाहन ते करत आहेत. लोकशाहीत कुणीही विरोधात उभे राहु शकतात शरद पवार यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेत अजित पवारांनी केलेल्या आरोपांचे चोख प्रत्युत्तर दिले. पण त्यांनीही निर्णय बारामतीकरांवर सोडून दिला आहे.बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार सुप्रिया सुळे यांच्या विरोधात कोणीही उभे राहू शकते. लोकशा- हीमध्ये निवडणुकीला उभे राहण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.

# मतदारांसमोर जाण्यासाठी सर्वच पक्षांमध्ये चढाओढ

प्रस्थापित राजकीय पक्षांसोबतच इतर लहान पक्षांचीही आपले अस्तित्व दर्शविण्याची धडपड दिसून येत आहे. ' मशागत केली जाते त्या पद्धतीने निवडणूक पूर्व संघटनात्मक बांधणीला व लोकप्रश्नांवर आंदोलने करण्याला आता मोठ्या प्रमाणात प्रारंभ झाला आहे. यात प्रस्थापित राजकीय पक्षांसोबतच इतर लहान पक्षांचीही आपले अस्तित्व दर्शविण्याची धडपड दिसून येत आहे.आगामी निवडणुकांच्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्ष जोमाने तयारीला लागले असून, पक्ष संघटनात्मक पातळीवरील उत्साह वाढीस लावतानाच मतदारांसमोर जाण्यासाठीही त्यांच्यात चढाओढ सुरू झालेली आहे. निवेदनबाजी व जनआंदोलने त्यामुळे वाढली असून, विकासकामांच्या श्रेयाची स्पर्धाही रंगताना दिसणे स्वाभाविक ठरले आहे.निवडणुकीची तयारी आता दिवसेंदिवस गडद होऊ पाहते आहे. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या बैठका सुरू झाल्या असून, मतदारांच्या नजरेसमोर राहण्यासाठी त्यांची उपक्रमशीलताही वाढली आहे. यावर्षी प्रथम लोकसभा निवडणूक होणार असल्याने अपेक्षेप्रमाणे देशात ४०० जागांचा टप्पा गाठण्यासाठी



भाजप यात सर्वात आघाडीवर दिसत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पश्चिम वऱ्हाडतील पाच लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अकोला दौऱ्याचे नियोजन नजीकच्या काळात होत आहे. शेजारच्या बुलढाणा जिल्ह्यातही केंद्रीय मंत्र्यांचे वरचेवर दौरे होत आहेतच; मात्र भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाची महायुती असल्याने वऱ्हाडातील जागावाटपाबाबतचे चित्र स्पष्ट होण्याकडे नेत्यांसह कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा दौराही होणार आहे. तत्पूर्वी शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी त्यासाठी पेरणी सुरू केली आहे. वाशिम जिल्ह्यात शिवसेना नेते, मंत्र्यांचे दौरे वाढले आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांनीही वाशिमचा दौरा करून वाशिम-यवतमाळ, बुलढाणा-रावेर लोकसभा मतदारसंघावर लक्ष केंद्रित केल्याचे अधोरेखित होत आहे. काँग्रेस पक्षाने पश्चिम वऱ्हाडातील तीनही मतदारसंघांची चाचपणी केलेली आहे. इंडिया आघाडीतील जागावाटपाचे चित्र स्पष्ट होणे बाकी असले तरी त्यादृष्टीने हा पक्ष अगोदरपासूनच कामाला लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने पश्चिम वऱ्हाडावर लक्ष केंद्रित केले असून आमदार अमोल मिटकरी यांच्या माध्यमातून विकासकामांवर भर दिला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटही जोमाने कामाला लागल्याचे चित्र आहे. राजकीय व सहकार क्षेत्राच्या माध्यमातून शेतकरी, सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेते, कार्यकर्ते झटत आहेत. अकोला लोकसभा मतदारसंघाकडे ड. प्रकाश आंबेडकर यांनीही लक्ष केंद्रित करून त्यादृष्टीने दौरे सुरू केले आहेत.मतदारांच्या नजरेत भरावा अशा विकासकामांवर सत्तापक्षाकडून भर दिला जात आहे. यामध्ये प्रामुख्याने रस्ते दुरुस्ती, बांधणीची कामे हाती घेण्यात आल्याचे निदर्शनात येत आहे. दुसरीकडे अकोला जिल्ह्यात शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी शेतमालाला उत्पादनखर्चावर आधारित दराची गॅरंटी मिळावी, यासाठी शेतकरी संघर्ष यात्रेचा प्रारंभ करून ग्रामीण भाग पिंजून काढण्यावर भर दिला आहे. मनसे, बसपा, प्रहार, रिपाइं असे अन्य पक्षही आपापल्या शक्तीप्रमाणे बैठकांचा धडाका लावून आपले अस्तित्व अधोरेखित करण्याच्या प्रयत्नात दिसून येत आहेत. शेतकरी, शेतमजूर, शहरी, ग्रामीण भागातील जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर सर्वच राजकीय पक्षांकडून भर देण्यात येत आहे. प्रत्येक समाज, छोट्या-छोट्या घटकांच्या समस्या, गाऱ्हाणे शासनदरबारी मांडण्यासाठीची निवेदनबाजी वाढलेली आहे. उपोषण मंडपांना भेटी देऊन सहानुभूती प्राप्त करण्यावरही भर दिला जात आहे.येऊ घातलेली लोकसभा निवडणूक सत्ताधाऱ्यांना जेवढी महत्त्वाची आहे, त्यापेक्षा अधिक ती विरोधी पक्षांसाठी महत्त्वाची असल्याने त्यांचे नेते, पदाधिकाऱ्यांचे ग्रामीण भागातील दौरे वाढले आहेत. लोकप्रतिनिधी केलेल्या कामांचे श्रेय घेऊ पाहत असून, विरोधक मात्र ती कामे पूर्वीच कशी मंजूर झाली आहेत, हे सांगण्याच्या प्रयत्नात दिसत आहेत. यावरून श्रेयवादाची लढाई रंगताना दिसत आहे.सारांशात, निवडणूक घोषित होण्यापूर्वी सारेच राजकीय पक्ष जोमाने कामाला लागले असून मतदारांचे मन काबीज करण्यासाठी साऱ्यांची धडपड सुरू झाली आहे. राजकीय विषय, लोकहिताचे मुद्दे व स्थानिक विकासकामे अशा विविध पातळींवर सध्या मशागत सुरू असून, यात कोण पुढे जाते, हेच आता पाहायचे.

# पंचवीस हजार शब्दांमधून साकारले छत्रपती शिवराय

### भारती विद्यापीठ प्रशालेचा अनोखा उपक्रम

कडेगांव : छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र काढावे अशी इच्छा महाराष्ट्रमध्ये प्रत्येक माणसाला एकदा तरी होते. विशेषता लहानपणी प्रत्येक जण एकदा तरी शिवाजी महाराजांचे चित्र काढतोच. पाटीवर ,वहीवर, पुस्तकावर, भिंतीवर वा कुठेही शिवाजी महाराजांचे चित्र काढल्याशिवाय मराठी मुलांचे बालपण साजरे होतच नाही. मग ते जातीवंत चित्रकार असतील. त्यांचे रंग आणि कुंचले महाराजांना विसरणे अशक्यच. शिवाजी महाराजांचे एखादे तरी चित्र न काढलेला लहान मोठा चित्रकार निदान महाराष्ट्रात तरी मिळणारच नाही. जगामध्ये अनेक कलाकारांनी रांगोळी. कोलाज. वाळू शिल्प अशा अनेक प्रकारच्या माध्यमातून अनेक रेकॉर्ड केलेले आहेत असाच एक अनोखा उपक्रम रेकॉर्ड भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज मुंबई शाळेतील विद्यार्थ्यांनी साकारलेला आहे.




सोमवारी ( ता. १९ ) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने २५ तासांमध्ये पंचवीस हजार शब्दात सुमारे १२ बाय १६ फूट या साईज मध्ये शिवरायांची प्रतिमा भारती विद्यापीठ प्रशालेचे उपक्रमशील कलाशिक्षक नरेश लोहार यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी त्यांच्या लेखणीतून लिहून काढली असून छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा केला आहे. बाबासाहेब पुरंदरे यांच्या महाराज या पुस्तकाच्या आवृत्ती मधून छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रसंग विद्यार्थ्यांनी व कलाशिक्षक नरेश लोहार यांनी लिहिले आहेत हा आगळा वेगळा उपक्रम नवी मुंबई परिसरामध्ये व महाराष्ट्रामध्ये प्रशंसनीय झाला आहे. विद्यार्थ्यांना कलेबरोबर त्यांचे हस्ताक्षर सुधारणे व छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास माहीत असणे आवश्यक आहे हा त्या पाठीमागील उद्देश आहे .

अनोख्या उपक्रमामध्ये नूतन मिसाळ, गणराज येशी, आर्यन वंडाळे ,अर्पिता पाटील, निकिता सातपुते, स्वरांजली प्रबळकर, रिंकल कातकरी, अनुष्का चिखले वैष्णवी पाटील, अश्विनी पाटील, सृष्टी बळीप, राधिका इंगळे या विद्यार्थ्यांनी आपल्या सुंदर हस्ताअक्षरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रसंग स्वतः लिहिलेले आहेत.

याही अगोदर कलाशिक्षक नरेश लोहार यांनी सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यात अमरापूर येथे ९० किलो तांदळाच्या माध्यमातून १७ बाय २८ फुटाची शिवरायांची प्रतिमा साकारलेली होती .तसेच ८बाय ६ या साईज मध्ये शिवरायांची कोलाज प्रतिमा साकारलेली होती .

या अनोख्या उपक्रमाबद्दल भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार विश्वजीत कदम , भारती विद्यापीठ शालेय शिक्षण विभागाच्या अध्यक्षा विजयमाला कदम , शालेय शिक्षण विभाग संचालक एम डी कदम नवी मुंबई विभागाचे संचालक विलासराव कदम, प्राचार्य बेल्लम आर टी, उपप्राचार्य आर एच कदम यांनी अभिनंदन केले आहे



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता लगावला टोला

**पाचगणी** : शेतकऱ्याच्या मुलाने हेलिकॉप्टर मध्ये फिरू नये असा काय कायदा आहे काय ? मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. वेळेची बचत व्हावी म्हणून सरकारी हेलिकॉप्टरने शेतात जातो तिथे अधिकारी, पदाधिकारी, शेतकरी यांचेशी संवाद साधून प्रश्न सोडवतो. मी मुख्यमंत्री झालो म्हणून माझ्या डोक्यात कसली हवा जाऊ दिली नाही. माझे पाय नेहमी जमिनीवर असतात आणि ती आपोआप शेतीकडे वळतात. त्यामुळे कुणी कितीही टीका टीपणी करुद्यात हेलिकॉप्टर मध्ये जाऊन फोटोग्राफी करण्यापेक्षा शेती केलेली काय वाईट आहे का असा सणसणीत टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव घेता लगावला.

पांचगणी येथील एम् आर ए सेंटरच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या ' स्ट्रॉबेरी विथ सी एम.' या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, आमदार मकरंद पाटील, भूषण गगरानी , जिल्हापरिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, जिल्हा पोलिस प्रमुख समीर शेख, जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्रशेठ राजपुरे, शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव, विकास शिंदे, मुख्याधिकारी निखिल जाधव, प्रवीण भिलारे, संजय गायकवाड, गणपत पार्टे, किसन शेठ भिलारे, नितीन दादा भिलारे, जिल्हा कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे, महेश रसाळ, तसेच स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

वसंतदादा पाटील यांचे नंतर थेट शेतकरी व सर्वसामान्यांशी नाळ जोडलेला मुख्यमंत्री म्हणून तुमच्याकडे पाहिले जाते शेतकऱ्यांच्या कल्यानासाठी काय सांगाल यावे बोलताना मुख्यमंत्री म्हणाले शेतकऱ्यांसाठी सरकार अनेक योजना राबवत आहे. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे.

सर्वसामान्यांची दुःख , अडचणी, समस्या, त्रास मी जवळून पहिल्या आहेत. मी बघतो करतो हे माझ्या डिक्शनरीत नाही. मी मुख्यमंत्री असलो तरी माझ्या डोक्यात कसली हवा नाही. मी मुख्यमंत्री नाही तर कॉमन मॅन समजतो. लोकांना भेटणे हा माझा छंद आहे.

घरात, मंत्रालयात बसून मी फेस बुक लाईव्ह करीत नाही लोकांना थेट फेस करतो. शेतकऱ्यांच्या बांधावर जातो शेतावर जातो असे सांगितले.

आमच्या गावची नव्हे तर सातारा जिल्ह्याची पाणी , हवा व पर्यावरण शुद्ध आहे. सातारा जिल्ह्यात राजकीय प्रदूषण ही इकडे नाही. महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी एक नंबरच आहे. येथील मुले नोकरी धंद्यासाठी मुंबईला जातात ती गावाला पुन्हा आली पाहिजेत आधुनिक पद्धतीने शेती करून या मुलांनी आर्थिक सक्षम व्हावे. असा सांगून स्ट्रॉबेरीचा रंग की चव आवडते यावर अहो स्ट्रॉबेरीचे सर्वच आवडते असे सांगितले.

शेतकरी व शेती अडचणीत आल्याबाबत विचारले असता आपल शेतकऱ्यांचे सरकार आहे. अवकाळी , गारपीट, हवामान यामुळे होणाऱ्या नुकसानीस आपण भरपाई दुप्पट केली आहे. शेतकऱ्यांना वर्षाला केंद्रातून ६००० दिले जातात आणि आपले राज्य सरकार ६००० रुपये असे बारा हजार रुपये दिले आहेत. आपण शेतकऱ्याना नेहमी मदत करत असतो. बळीराजाला आपण मदत करायची ते करतोय असे सांगितले.

शेती आणि राजकारण यामधील आव्हानांवर विचारले असता त्यांनी सांगितले शेतीमध्ये मोठी आव्हाने आहेत. अवकाळी, गारपीट, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे शेतकरी अडचणीत येतो आहे. यासाठी झाडे लावली पाहिजेत पर्यावरण वाचवले पाहिजे. राजकीय आव्हान आली की आम्ही घेतो शिंगावर. दीड पावणे दोन वर्षापूर्वी आले होते काही अंगावर पण घेतल आम्ही शिंगावर सातारा जिल्हा धाडसी आहे. असे शेवटी सांगितले.

# राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत पटकवली ४२ सुवर्णपदके

**पुणे** : आर. बी. होरांगी आणि सेंट फिलिक्स शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत ४२ सुवर्णपदके, ३३ रौप्य व १८ कांस्यपदके पटकवली. स्पर्धेत किरोगी, पुमसे, स्पीड किक, हपकिडो (सेल्प डिफेंस), गुप पुमसे, पेर पुमसे या खेळ प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत दुसरे सर्वसाधारण विजेतेपद मिळवले.

आर. बी. होरांगी तायक्वांदो दोजांग असोसिएशन यांच्या वतीने चंदननगर-खराडी येथे नुकतीच ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत आंध्रप्रदेश, कर्नाटक, गोवा, तेलंगणा, गुजरात मणीपूर ओडिशा बंगाल आणि महाराष्ट्र या राज्यातील सतराशेहून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. आर.



बी. होरांगीचे १२० पेक्षा अधिक खेळाडू यामध्ये सहभागी झाले होते. स्पर्धकांना आर. बी. होरांगीचे अध्यक्ष मास्टर रवींद्र भंडारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

माजी आमदार जगदीश मुळीक, पोलीस निरीक्षक राकेश कदम, माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, माजी नगरसेवक योगेश मुळीक, सेंट फिलिक्स शाळेच्या प्राचार्या सिस्टर जेनिफर, सिस्टर अर्सला, सिस्टर मार्था, सिस्टर एल्सा, पर्यवेक्षक लीना पॉल, पीटी शिक्षक सोनाली भोसले, रुपाली बनसोडे, माजी नगरसेविका सुनिता गलांडे, एकनाथ भंडारी, महेन्द्र भंडारी, तिरुपती भंडारी, बसवराज भंडारी या सर्व मान्यवरांनी उपस्थिती लावून सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

# एच एस सी बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारीपासून

**देवापूर** : महाराष्ट्र राज्यमाध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कोल्हापूर विभागामार्फत होत असलेल्या बारावी ( एच एस सी) बोर्ड परीक्षा २१ फेब्रुवारी २०२४ पासून सिद्धनाथ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसवड या केंद्र क्रमांक १४३ येथे विज्ञान शाखेचे ६१७ विद्यार्थी व एमसीव्हीसी विभागाचे १४ विद्यार्थी परीक्षा असे एकूण ७६० परिक्षा देणार आहेत सदर परीक्षा २१ फेब्रुवारी२०२४ पासून सुरू होत असून या केंद्राचे केंद्र संचालक प्राचार्य श्री दासरे प्रवीण उत्तमराव हे आहेत

येथील सिद्धनाथ हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसवड या केंद्रावर होत असलेल्या इयत्ता बारावी सायन्स या शाखेच्या परीक्षेचे मुख्य केंद्र सिद्धनाथ हायस्कूल असून या हायस्कूलचे मुख्य इमारत व पाठीमागील इमारतीचा दुसरा मजला व त्या इमारती शेजारील हॉल अशा १८ खोल्यांमध्ये ४५० विद्यार्थी व उपकेंद्र असलेल्या ज्ञानवर्धिनी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज म्हसवड या ठिकाणी २०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत

# पुण्यवंत, सामर्थ्यवंत! नीतिवंत, जाणता राजा!



रयतेचा राजा कसा असावा याचा पायंडा छत्रपती शिवाजी महाराजांनी खूप उत्तमपणे रचला. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकारून त्यांनी महाराष्ट्र घडवला. याच आपल्या राज्याचा आज जन्मदिवस. छत्रपतींचे नाव डोळ्यासमोर आले एक वेगळीच प्रतिमा तयार होते ज्या राजाने त्याचे संपूर्ण आयुष्य जनतेसाठी रयतेसाठी वाहले त्या रयतेच्या राजाचे कौतुक करावे तितके कमी आहे.शिवरायांचा हिंदवी स्वराज्य निर्मितीचा ध्यास असो, महाराष्ट्र घडवण्याचा त्यांचे योगदान असो, मराठा साम्राज्याचा इतिहास असो, महाराजांचे कार्य आणि त्यांचे शौर्य सदैव प्रेरणादायी आहे.

शिवरायांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला. खरं तर त्यांच्या जन्मतारखेबद्दल बरेच वाद होते यावर महाराष्ट्र सरकारने तोडगा काढत २००१ या वर्षी १९ फेब्रुवारी ही जयंती शिवरायांची जन्मतारीख निश्चित केली आणि तेव्हापासून १९ फेब्रुवारीला शिवजयंती देशभरात उत्साहात साजरी केली जाते.

**छत्रपती शिवाजीराजांचे मानवतावादी तत्त्वज्ञान**

आदिलशाही, निजामशाही आणि मुघल सत्ता किंवा स्वराज्यावर आलेल्या प्रत्येक संकटाला अत्यंत धैर्याने छत्रपती शिवाजी महाराजानी सामना केला आणि ते यशस्वी ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांची गाथा अजरामर आहे त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य रयतेच्या सुखासाठी स्वराज्याच्या स्वप्नासाठी वाहले. शेवटच्या क्षणापर्यंत ते लढले. अखेर रायगडावर ३ एप्रिल १६८० रोजी महाराजांनी अखेरचा श्वास घेतला. एक दक्ष राजा रयतेला पोरका करून गेला. मात्र महाराजांचं कर्तृत्व पराक्रम अनंत काळासाठी अजरामर आहे.

असे म्हणतात.. महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८६९ साली रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांचे समाधी स्थळ शोधून काढले आणि त्यांनी महाराजांच्या जीवनावर आधारित पहिला पोवाडा लिहला.

शिवजयंती आली की शिवरायांचा आपण जयघोष करतो मात्र केवळ आणि केवळ शिवजयंती पर्यंतच महाराजांना मर्यादित ठेवायचे आहे का याचा विचार करायला हवा. महाराजांच्या नावाचा जयघोष करणाऱ्यांचा महाराष्ट्रात सुकाळ आहे आणि त्यांच्या विचारांना कृतीत आणणार्या लोकांचा मात्र दुष्काळ आहे ही महाराष्ट्राची सध्याची वास्तविकता आहे.

आज खरं तर महाराष्ट्राला शिवाजी महाराजांच्या आचार-विचारांची गरज आहे महाराजांनी शिकवलेल्या त्या छोट्या छोट्या मूल्यांची जपणूक करण्याची गरज आहे महाराष्ट्रातील महाराजांचा ऐतिहासिक वारसा असलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे या सर्व व्यतिरिक्त महाराजांच्या आदरांजली देण्याकरिता केवळ आणि केवळ शिवजयंतीच्या चौकटीत न राहता शिवरायांची विचारसरणी आत्मसात करून ती प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे.

# येरलवाडीत ७० हजारांचा गांजा जप्त

**वडूज** : खटाव तालुक्यातील वडूज पोलीस ठाणे हद्दीतील येरळवाडी गावचे हद्दीतील ज्वारीच्या शेतीमध्ये गांजा आम्ली पदार्थाचे झाडाची लागण केल्याचे गोपनिय बातमीनुसार वडूज पोलीस ठाणे पथका मार्फत कारवाई करुन आरोपी यास ताब्यात घेवून त्याचे कडून ७०,५०० /- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

श्री. समिर शेख पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती आँचल दलाल अप्पर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अंमली पदार्थ गांजा याची विक्री, लागवड व वाहतूक करणारे इसमांचे विरुद्ध कारवाई करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे वडूज पोलीस ठाणे यांना दिलेल्या आहेत.

श्री.शहाणे प्रभारी अधिकारी वडूज पोलीस ठाणे यांना त्यांचे विश्वसनीय बातमीदारामार्फत गोपनिय माहिती मिळाली कि, वडूज पोलीस ठाणे हद्दीत मौजे येरळवाडी गावी रानमळा नावाचे शिवारात ज्वारीचे शेतात बाबासो गंगाराम जाधव रा. येरळवाडी ता. खटाव जि. सातारा याने अंमली पदार्थ गांजाच्या झाडाची लागवड केली असून त्याची तो जोपसना करीत आहे. वडूज पोलिसांनी या ठिकाणी छापा कारवाई केली .

बातमीच्या ठिकाणी छापा कारवाई करुन सदर इसम जाधव रा. येरळवाडी ता. खटाव व त्याने ज्वारीचे शेतात अंमली पदार्थ गांजाच्या झाडाची लागवड केलेली झाडे असा एकूण ४.७६५ किलो ग्रॅम वजनाचे व ७०,५०० /- रुपये किंमतीची गांजाची झाडे जप्त करुन त्याचेविरुद्ध वडूज पोलीस ठाणे गुरनं. ६४/२०२४ अंमली पदार्थ औषधी द्रव्ये व मनप्रभावी पदार्थ अधिनियम कलम ८, २० (अ) (ब) (२) प्रमाणे गुन्हा नोंद केला आहे.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# विद्यालयातून पुस्तकी ज्ञानारोबर व्यवहारीक ज्ञानाची जोड दिल्यास विद्यार्थी सुजाण आणि स्वावलंबी बनू शकतो. आम. डॉ. राजेंद्र पाटील

**कुरुंदवाड -** विद्यालयातून पुस्तकी ज्ञानारोबर व्यवहारीक ज्ञानाची शिक्षणात जोड दिल्यास विद्यार्थी सुजाण आणि स्वावलंबी बनू शकतो. त्यासाठी कौशल्यावर आधारित शिक्षण गरजेचे आहे असे प्रतिपादन आमदार डॉराजेंद्र पाटील यड्रावकर यांनी केले.

येथील एस के पाटील महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडामहोतसवाच्या पारितोषिक वितरण प्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमदार यड्रावकर बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष जयराम पाटील होते.

आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर पुढे म्हणाले या महाविद्यालयात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्याचे काम बाब आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वा



मिळतो असे सांगून ते म्हणाले त्याचा आदर्श नागरिक बनण्यासाठी शिक्षण आणि व्यवहारी ज्ञान असणे गरजेचे आहे तरच आपण यशस्वी होऊ असे सांगून त्यांनी महाविद्यालयाला येणाऱ्या शैक्षणिक अडचणी दूर करण्याचे अभिवचन दिले तसेच कॉलेजकडे येणारा रिंग रोड हेही काम तात्काळ करण्यात येईल असे सांगून त्यांनी या परिसरातील महाविद्यालयास येणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनिना एसटीची गैरसोय दूर करण्यासाठी मी विशेष प्रयत्न करणार असल्याचे सांगून ते म्हणाले शिक्षण संस्थेविषयी असलेली विजय पाटलांची तळमळ निश्चितच कौतुकास्पद आहे सामाजिक व शैक्षणिक कामा संदर्भात त्यांनी विवेचन केले आहे त्याचा निश्चित पाठपुरावा केला जाईल अशी त्यांनी सांगितले

प्रारंभी संस्थेचे प्रमुख विजय पाटील यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांसाठी आवश्यक गरजा कथन केले.

यावेळी जयराम पाटील, वसंतराव पाटील, डॉ. नितीन घोरपडे, प्राचार्य डॉ. आर. एस. कदम यांची भाषणे झाली.

यावेळी आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या हस्ते विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देवून सत्कार करण्यात आला.

डॉ. श्रद्धा कोठावळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. सुनिल चव्हाण यांनी जिमखाना अहवाल वाचन केले. संदीप सावगावे यांनी शैक्षणिक अहवाल वाचन केले. तर संजय पाटील यांनी ज्युनिअर जिमखाना अहवाल वाचन केले.

कार्यक्रमास सागर पाटील, रामचंद्र मोहिते, अक्षय आलासे, बाळासो दिवटे, अजित देसाई, महिपती बाबर, राजमहंमद बागवान यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

स्वागत उपप्राचार्य डॉ. सुनिल चव्हाण यांनी केले.

# वाळू उपशाला परवानगी मिळाल्याने लवकरच वाळू उपसा सुरू होणार

**शिरोळ :** हरित लवादाने प्रदूषणाचा मुद्दा समोर करून सन २०१७ पासून शिरोळ तालुक्यातील वाळू उपसा बंद झाला आहे. या वाळू व्यवसायावर अवलंबून राहणार्या हजारो कामगारांच्या हाताचे काम गेले होते. तब्बल ७ वर्षानंतर पुन्हा शासनाने नवीन नियम व ऑनलाइन पद्धतीने वाळू उपसाची योजना राबवण्याचा निर्णय घेतला असून या प्रक्रियेच्या माध्यमातून शिरोळ तहसील कार्यालयाने पाठवलेल्या २० प्रस्तावापैकी शिरोळ तालुक्यातील ६ प्रस्ताव मंजूर झाले असून तालुक्यातील घालवाड, अर्जुनवाड, कवठेगुलंद, शेडशाळ या गावात वाळू कशाला परवानगी मिळाल्याने लवकरच वाळू उपसा सुरू होणार असल्याचे तहसीलदार कार्यालयातून सांगण्यात आले.

एखाद्या व्यक्तीला बांधकामासाठी वाळू हवी असल्यास वाळूची मागणी ऑनलाईन नोंदवता येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना तसंच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलासाठी संबंधित अधिकार्यांनं सादर केलेली यादी तहसीलदार तपासून पाहतील आणि तहसीलदारांच्या लेखी परवानगीनंतर लाभार्थ्यास वाळू डेपोतून विनामूल्य वाळू उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. वाहतुकीचा खर्च मात्र लाभार्थ्यास करावा लागणार आहे. महाराष्ट्र शासन प्रायोगिक तत्वावर १ वर्षासाठी हे धोरण राबविण्यात येणार असल्याचे समजते.

अलीकडे सर्वसामान्य माणसाला ७ ते ८ हजार रुपये प्रति ब्रास या दरानं वाळू खरेदी करावी लागायची. एकीकडे वाळूचा तुटवडा आणि दुसरीकडे वाळूला मिळणारा प्रचंड दर, यामुळे राज्यात अवैध वाळू उपशाची प्रकरणं घडायची. अवैध वाळू उपसा रोखणार्या शासकीय अधिकार्यांना जीवे मारण्याचा प्रयत्नही व्हायचा. आता मात्र नवीन वाळू धोरणानुसार परिस्थिती सुधारणार आहे.

नवीन धोरणानुसार, वाळूच्या उत्खननासाठी राज्य शासनाकडून आधी नदीपात्रातील वाळूचे गट निश्चित करण्यात आले असून या वाळू गटातून वाळूचं उत्खनन केलं जाणार आहे. मग ही उत्खनन केलेली वाळू शासनाच्याच तालुका स्तरावरील वाळू डेपोमध्ये साठवून तिथूनच तिची विक्री करण्यात येणार आहे.

**नियमबाह्य घटना घडल्यास ठेका होणार रद्द**

**शिरोळ तालुक्यातील सहा ठिकाणी वाळू उपसा करण्यात येणार असून यामध्ये शासनाच्या नियमात राहूनच वाळू उपसा करावा लागणार असून यात नियमबाह्य कोणतीही हालचाल केल्यास थेट संबंधित ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार संबंधित महसूल प्रशासनाने राखून ठेवला असल्याने सदरचा वाळू उपसा पारदर्शक होणार आहे.**

**या ठिकाणी होणार वाळू उपसा**

**दरम्यान घालवाट येथील गट नं. १७० ते १८२, १८६ ते १८८ तर दुसर्या ठिकाणी गट नं.२०२ ते २०५, अर्जुनवाड येथील गट नं. ७१५ ते ७४३ तर दुसर्या ठिकाणी गट नं.३२ ते ७७, कवठेगुलंद येथील गट नं.५ ते २०/७, शेडशाळ येथील गट नं.७४५/१-२, ७३६, ७३७, ७३८, ७३९, ३,४,५३,५९,७१,८८ या सहा ठिकाणी वाळू उपसा करण्यासाठी परवानगी मिळाली असल्याचे सांगण्यात आले.**



## शिवजंयतीनिमित्त मद्यविक्री बंद

**सातारा :** मुंबई मद्य निषेध कायदा १९४९ मधील कलम १४२(१) मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या शक्तीचे अनुसार असा आदेश देण्यात येत आहे. की, शिवजयंती निमित्त कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सातारा शहरातील मिरवणुक मार्गावरील सर्व देशी दारु किरकोळ विक्री (सीएल-३) बिअर विक्री परवाने (एफएल/बीआर-२) विदेशी मद्यविक्री (एफएल-२) परवानाकक्ष (एफएल-३) बिअरबार (फॉर्म ई) व ताडी दुकान टीडी-१ या अनुज्ञप्तीची जागा व विक्री दिनांक १९ फेब्रुवारी पर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

## हडपसरमधील सोलापूर रोड मुख्य रस्त्यावरील रस्ता खोदाईने नागरिक त्रस्त

### रस्ता खोदून ठेवल्याने वाहतुक कोंडी बरोबर अपघातास निमंत्रण

**हडपसर :** हडपसरमधील सोलापूर मुख्य रस्त्यावरील सायकल ट्रॅक रस्ता काढून त्यावर रस्ता रुंदीकरण करण्याचे काम पुणे महापालिकेकडून करण्यात येत असून सोपल आर्यन टॉवर समोरील , सन्मित्र बँक समोरील रस्ता खोदाई करुन ठेवण्यात आल्याने येथील रस्त्यावर नागरीकांच्या सुरक्षेसाठी बॅरिकेट्स तसेच कुठलेच साधने वापरण्यात येत नसल्याने मुख्य रस्त्यावर रात्रीच्यावेळी मोठे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.येथील फुटपाथ व सायकल ट्रॅक हटवून तसेच रस्ता खोदाई करुन बरेच दिवस झाले तरी रस्त्याचे काम लवकर मार्गी लागत नसल्याने येथील रस्त्यावर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

रस्त्यावर पसरलेल्या खडी मातीमुळे दुचाकी वाहाने घसरून अपघात घडत आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्यावरील खोदून ठेवण्यात आलेला रस्ता नागरीकांच्या लवकर लक्षात येत नसल्याने अपघाताचे धोके निर्माण झालेले आहे.पुणे महापालिकेकडून सोलापूर रोड मुख्य रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने होत असल्याने नागरीकांना वाहतूक कोंडी, रस्त्यावरील खोदलेल्या खडीमातीचा त्रास सहन करावा लागत आहे.तातडीने येथील रस्त्याचे काम मार्गी लावण्यात यावे अशी मागणी नागरीकांनी केली आहे.

## विनयशीलतेला संवेदनशीलतेचा आधार

# सटाणा आगारातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची कामगिरीच बहारदार

**सटाणा, नाशिक :** आपल्या आस्थापनेतील सामान्य कर्मचारी आजारपणात असताना त्याचा वैद्यकिय उपचार चांगल्या पद्धतीने व्हावा, त्याची प्रकृती लवकरात-लवकर पुर्वपदावर यावी, उपचार घेताना आर्थिक मर्यादांचा अडसर निर्माण होऊ नये यासाठी सटाणा आगारातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी संवेदनशीलतेचा आदर्श उभा केला आहे. राज्य परिवहन मंहामंडळाच्या सटाणा आगारात वामनराव किसनराव देवरे हे कंत्राटी पद्धतीने स्वच्छतादूत म्हणून कार्य करतात ते अत्यंत विनयशील व नम्र कर्मचारी म्हणून सर्वश्रुत आहेत, कोणतेही काम असो वामनराव हे कधीही



त्या कामाला नाही म्हणत नाहीत असे अजातशत्रू व विनम्र वामनराव अल्प आजाराने व्याधीग्रस्त झाले.

त्यांच्या व्याधीवर उपचारासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होणार होता, म्हणून सटाणा आगारातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वामनराव यांच्या वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक स्वरूपात मदत करायचे ठरवले. त्या अनुषंगाने दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ रोजी आगारातील सर्व अधिकारी पर्यवेक्षक व कर्मचारी यांच्या माध्यमातून उभारलेला निधी प्रकृती स्वास्थ्तेसाठी शुभेच्छा देऊन लिफाफा बंद आर्थिक मदत ही वामनराव देवरे यांच्या हाती सोपविली.

सटाणा आगाराचे व्यवस्थापक राजेंद्र अहिरे यांनी जेव्हापासून या आगाराचा पदभार हाती घेतला तेव्हापासून या आस्थापनेच्या कामात व दर्जात मोठा बदल जाणवू लागला आहे. स्वच्छतेच्या अभियानात विभागीय स्तरावर अव्वल स्थानावर येणे, परिसरात रंगरंगोटी-स्वच्छता, निटनेटकेपणा, प्रवासीकेंद्री धोरणाला प्राधान्य, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना मानवी दृष्टीकोनातून समजून घेत आस्थापनेत कौटूंबिक जिव्हाळा निर्माण करणे आणि या सर्व प्रक्रियेतून दर्जाही हमी मिळवणे हे त्यांच्या व्यवस्थापकिय कौशल्याचे गुणे अधोरेखित करण्यासारखे ठरले आहेत.

कर्तव्यशीलबरोबरच संवेदनशीलतेची कास धरत समाजशीलतेचा वसा जपणे ही त्यांची शिकवण आपल्या सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना असते, त्यांच्या या भूमिकेला त्यांचे सहकारी आणि कर्मचारी मोठ्या आनंदाने साथ देतात,

याच जिव्हाळ्यातून आपल्या आगारातील स्वच्छतादूत वामनराव देवरे यांच्या वैद्यकिय उपचारासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या पदरकमाईतून मदत केली. या विनयशील स्वच्छतादूताच्या उपचारासाठी आगारातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जो संवेदनशीलतेचा आधार दिला त्याचे सर्वत्र कौतूक होत आहे.



## पॅराग्लायडींग साहसी खेळाची जागतिक स्पर्धा घेणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**सातारा :** पॅराग्लायडींग या साहसी व आव्हानात्मक खेळाची जागतिक स्पर्धा घेतली जाईल या स्पर्धेसाठी शासन सर्व ती मदत करेल अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

टाईम महाराष्ट्र आयोजित पॅराग्लायडींग प्री वर्ल्ड कप स्पर्धा-२०२४ बक्षीस वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री शंभूराज देसाई , आमदार मकरंद पाटील,मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, टाईम महाराष्ट्रचे मुख्य संपादक राजेश कोचेकर आदी उपस्थित होते. पॅराग्लायडींग करणे हे साहसी व आव्हानात्मक असून जमिनीवर उतरणे तितकेच महत्त्वाचे आहे. दऱ्या खोऱ्यांनी व निसर्गसंपदेने नटलेल्या व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत या स्पर्धेचे चांगले आयोजन केले आहे.पॅराग्लायडींग या खेळाची जागतिक स्तरावरील स्पर्धा लवकरच महाराष्ट्रात घेतली जाईल, असे सांगून छत्रपती शिवाजी महाराज यांची उद्या जयंती आहे या निमित्ताने जनतेला शुभेच्छा त्यांनी दिल्या.

## माजी सैनिकांसाठी स्वयंरोजगार मेळावा

**सातारा :** सातारा जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी/वीर माता/वीर पिता/माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पत्नी यांना कळविणेत येते की दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता सैनिक स्कूल सातारा, ऑडीटोरीयम येथे कृषी विषयक (कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, खादी ग्रामोद्योग व रेशीम उद्योग) स्वयंरोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तरी या सुवर्णसंधीचा लाभ सातारा जिल्ह्यातील सर्व वीर पत्नी/वीर माता/वीर पिता/माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पत्नी यांनी घ्यावा असे आवाहन मेजर आनंद पाथरकर, सेना मेडल (निवृत्त), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सातारा यांनी केले आहे.

## बाल लैंगिक अत्याचाराविषयी आश्रमशाळांमध्ये जाणीव जागृत होणे काळाची गरज : नितीन उबाळे

**सातारा :** बाल लैंगिक अत्याचाराविषयी आश्रमशाळांमध्ये जाणीव जागृती होणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सातारा चे आयुक्त नितीन उबाळे यांनी केले.

सुवर्धिनी फाऊंडेशन, सातारा व इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आश्रमशाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी पोक्सो कायदा जागृती व प्रशिक्षण कार्यशाळा या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून प्रशिक्षणार्थींना नितीन उबाळे यांनी संबोधित केले.

आश्रमशाळातील बालके आपलीच मुले आहेत, असे समजून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचे आवाहन नितीन उबाळे यांनी केले.

पोक्सो कायदा प्रशिक्षण कार्यशाळेत बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम २०१२ (पोक्सो कायदा) मधील कायदेशीर तरतुदींविषयीची माहिती ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे-काटकर यांनी दिली. माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून होणारे सायबर गुन्ह्यांचे प्रकार आणि त्यापासून बालकांचे संरक्षण, समाज माध्यमांचा सुरक्षित वापर या विषयावर सायबर सुरक्षा तज्ञ इंजी. वैशाली मंडपे यांनी मार्गदर्शन केले. तसेच पिडीत व्यक्तींवर लैंगिक अत्याचाराचे परिणाम, लैंगिक अत्याचारग्रस्त बालक कसे ओळखावे या विषयावर डॉ. धनश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा के.बी.पी. इंजिनिअरिंग महाविद्यालच्या सभागृहात पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आभार सुवर्धीनीच्या संचालिका शुभांगी दळवी यांनी केले.

## पुणे,पिंपरी चिंचवड मुंबई येथे बॉम्ब फोडणार असल्याचा नियंत्रण कक्षास खोटा करणारा हडपसर पोलीसांच्या ताब्यात

**हडपसर :** दिनांक १६.०२.२०२४ रोजी एका अज्ञात इसमाने पुणे शहर नियंत्रणकक्षास कॉल करून कळविले की, दिनांक १६/०२/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वा. चे सुमारास शिवाजीनगर, पिंपरी चिंचवड, पुणे रेल्वे स्टेशन, मुंबईला बांद्रा आणि गेटवे ऑफ इंडिया या ठिकाणी बॉम्ब फोडण्यात येणार आहे असा कॉल नियंत्रण कक्षास केला.

प्राप्त झालेल्या कॉलचे गांभिर्य व दिनांक १६/०२/२०२४ हडपसर पोलीस ठाणे हद्दीत असलेली व्हीव्हीआयपी मुव्हमेंट यामुळे संतोष पांढरे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन, यांनी तपास पथक अधिकारी , अंमलदार यांना नमुद इसमाचा शोध घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे तपासपथक अधिकारी सपो.निरीक्षक अर्जुन



कुदळे, पोलीस अंमलदार संदीप राठोड, अतुल पंधरकर, अनिरूध्द सोनवणे, अमित साखरे यांचे पथकाने तांत्रिक तपास करून कॉल करणारा इसम नामे प्रविण पंडित येशी वय ३५ वर्ष, धंदा-इलेक्ट्रिशीयन, राहणार गंगोत्री कॉम्पलेक्स ३ रा मजला, फ्लॅट नंबर-१०, महादेवनगर, मांजरी रोड, हडपसर पुणे हा मिळून आला. त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे पुणे शहर पोलीस नियंत्रण कक्षास केलेले कॉलबाबत विचारणा केली असता, त्याने दारु पिवून, दारुचे नशेत सदर कॉल केलेला असल्याचे सांगितले. पोलीसांनी कसून चौकशी केली असता प्राप्त कॉलप्रमाणे कोणताही प्रकार नसल्याचे त्याने प्राथमिक चौकशीत सांगितले. सदर प्रकरणाचे अनुषंगाने बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं ५१/२०२४ भादंवि कलम- १८२ (ब), ५०६(२), ५०५ (ब), ५०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असल्याने ताब्यात घेण्यात आलेल्या संशयीत आरोपीस पुढील कार्यवाही साठी बंडगार्डन पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास बंडगार्डन पोलीस स्टेशनचे पो.उप. निरी लोहार हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे शहर ,मनोज पाटील अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग आर राजा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांचे मागदर्शनाखाली पथकाने कामगिरी केली.

# फलटणमध्ये आजपासून शायनिंग महाराष्ट्र प्रदर्शनाचे आयोजन

### ▪ खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा पुढाकार: तीन दिवस चालणार प्रदर्शन

**फलटण :** माढा लोकसभा मतदार संघाचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या कल्पकतेतून दिल्ली येथील सांसा फाउंडेशनच्या वतीने फलटण येथील शुभारंभ लॉन्स येथे सोमवार दिनांक १९ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी यादरम्यान शायनिंग महाराष्ट्र २०२४ या तीन दिवशीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या विविध योजना व खात्यांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना एकाच छताखाली देण्याच्या हेतूने देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनातून हे प्रदर्शन होत असल्याची माहिती फलटण - कोरेगाव विधानसभा मतदारसंघ भाजपा अध्यक्ष सचिन कांबळे - पाटील यांनी रविवारी पत्रकारांना दिली.

ते पुढे म्हणाले की, सोमवार दि. १९ रोजी सकाळी ११ वाजता सौ. जिजामाला रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून भाजपाचे जेष्ठ नेते प्रल्हादराव सालुंखे-पाटील, विरोधी पक्षनेते समशेरसिंह नाईक निंबाळकर, ऐड. नरसिंग निकम, भाजपा जिल्हा सरचिटणीस जयकुमार शिंदे, भाजपा जिल्हाध्यक्ष तुकाराम शिंदे, फलटण नगर परिषद गतनेते अशोकराव जाधव, विधानसभा प्रभारी विश्वासराव भोसले, भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष धनंजय पवार, अल्पसंख्यांक राज्य उपाध्यक्ष अनुप शहा, किसान मोर्चा राज्य उपाध्यक्ष सुशांत निंबाळकर, महादेव अलगूडे, महादेव पोकळेआदी मान्यवर प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित राहणार आहेत.

सरकारच्या विविध खाती आणि योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी यासाठी ग्रामीण भागात प्रदर्शन आयोजित करण्यासाठी सांसा फाउंडेशन ही स्वयंसेवी संस्था काम करते. या उपक्रमातून यावेळी फलटण येथे हे प्रदर्शन होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनामध्ये भारत सरकारच्या कृषी विभाग, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विभाग, डीआरडीओ, भूजल सर्वेक्षण, आयुष, भारतीय रिझर्व बँक, नॅशनल केमिकल फर्टीलायझर, खादी उद्योग, राष्ट्रीय बांबू मिशन, राष्ट्रीय मानक बुरो, हातमाग, ताग उद्योग, हस्तकला उद्योग अशा भारत सरकारच्या विविध खाती आणि उपक्रमांचे स्टॉल्स मांडण्यात येणार आहेत. केंद्र सरकारचे वरिष्ठ अधिकारी याबांबतची माहिती लोकांना सांगणार आहेत. विद्यार्थी, महिला, नागरिक, ज्येष्ठ नागरिक अशा सर्व वयोगटाच्या नागरिकांना हे प्रदर्शन पाहण्यासाठी मोफत असणार आहे.

देश पातळीवरील या प्रदर्शनाचा फलटण मधील सर्व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बजरंग गावड़े, अमोल सस्ते, संतोष गावड़े, सनी मदने, उषा राऊत यांनी केले आहे. केंद्र सरकारच्या वतीने देशवासीयांसाठी राबविण्यात येत असलेल्या अनेक योजनांची माहिती ग्रामीण भागांतील सर्व सामान्य माणसाना व्हावी या हेतूने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

# आमदार सुनिल शेळके यांच्या प्रयत्नातून मिळाले जात प्रमाणपत्र

## आदिम सेवा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी

**वडगाव मावळ :-** 'पुर्ण मावळ तालुक्यात आमदार सुनिल शेळके यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या आदिम सेवा अभियानांतर्गत कुणे ना.मा.येथील ६८ कातकरी व ठाकर बांधवांना जात प्रमाणपत्रांचे वाटप शनिवार (दि.१७) करण्यात आले.

लोणावळा शहराच्या जवळ असलेल्या कुणे गावातील ठाकर व कातकरी समाजातील अनेक नागरिकांकडे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंरही जातीचे दाखले उपलब्ध नाहीत.शैक्षणिक कामांसाठी, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असते. परंतु ज्यांचे पूर्वज शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर होते.अशा कुटुंबातील नागरिकांना जात



प्रमाणपत्र काढण्यासाठी खुप त्रास सहन करावा लागतो व दाखला मिळत नसल्याने विविध शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागते.आजपर्यंत विविध शिबिरे, योजनांच्या नावाखाली केवळ कागदपत्रे जमा केली जातात.परंतु सर्व प्रक्रिया पूर्ण करुन दाखले कोणीही मिळवून देत नव्हते. त्यामुळे आश्वासनांशिवाय या नागरिकांच्या पदरात काहीच पडले नव्हते.

परंतु आमदार शेळके यांनी आदिम सेवा अभियान प्रभावीपणे राबवित तालुक्यातील प्रत्येक वाडी-वस्तीवर जाऊन नागरिकांच्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेणे व शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणे यामुळे या नागरिकांना अखेर जातीचे प्रमाणपत्र उपलब्ध झाले आहेत.अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जातीचे दाखले मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य सागर उंबरे,सुरेश होले,अशोक गोजे, कमलबाई वाघमारे,अश्विनी वाघमारे, रामदास शेलार, माजी पंचायत समिती सदस्य महादू उघडे, अविनाश लोमटे, बाळू गोजे, हरीश तांडील, शंकर भस्मे, खंडू ठोंबरे, भागू होले,अनंता मेंगाळ, चंदर ठोंबरे, सागर गोणते, अमित शिवणेकर, यशवंत ठोंबरे, गणेश जाधव, बाळू होले व ग्रामस्थ उपस्थित होते.

# जुन्नर येथे ७० पर्यटकांना आग्या मोहोळाच्या मधमाशांनी घेतला चावा

## जखमींमध्ये दोन लहान मुलांचा समावेश

**नारायणगाव :** लेणी संवर्धक चळवळीच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यातील विविध लेण्यांची साफसफाई करण्यासाठी तसेच तेथे असलेली पुरातन माहिती व लेण्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी पुण्याहून काही बौद्ध संघटनांचे सुमारे सव्वाशे कार्यकर्ते पदाधिकारी जुन्नर जवळील बौद्ध लेण्या समुह पाहण्यासाठी आले होते. यावेळी यातील ७० पर्यटकांना आग्या मोहोळाच्या मधमाशांनी चावा घेऊन त्यांना जखमी केले. ही घटना आज दुपारी तुळजा लेणी समुहाजवळ घडली.

दरम्यान जखमींमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. जखमीं पैकी यातील चौघांची प्रकृती गंभीर झाली होती तर एक जणाचे ब्लडप्रेशर वाढले होते. मात्र जुन्नर ग्रामीण रुग्णालयात योग्य उपचार घेतल्यानंतर त्या रुग्णांना बरे वाटू लागले आहे. काहीजणांना उपचार करून बरे वाटल्याने त्यांना घरी सोडण्यात आले. अशी माहिती पर्यटकांसोबत व सहली सोबत आलेले कार्यकर्ते सागर कांबळे यांनी दिली.

दरम्यान बुद्ध लेण्या मुक्त आंदोलन समिती, पुणे यांच्या वतीने बुद्ध सहलीचे आयोजन करण्यात आले होते. शासनाचा पुरातत्व विभाग बुद्ध लेण्या कडे दुर्लक्ष करत असल्यामुळे तेथील लेण्यांची साफसफाई करण्यासाठी तसेच तेथील माहिती जाणून घेण्यासाठी पुणे येथून आज बुद्ध सहल आयोजित करण्यात आली होती. जुन्नर मध्ये असलेल्या महाराष्ट्रातील सर्वात जास्त लेण्या म्हणजेच ३५० लेण्या असल्याने येथे देश परदेशातून बौद्ध भिक्षू व पर्यटक नेहमी येत असतात.



# मानदेशीं पठारावर गजनृत्य हलगीच्या तालावर झालीं तोंडले मार्तंडभैरवाची स्थापना

**फलटण :** सातारा जिल्ह्याच्याच्या बिजवडी मानदेशी पठारावर मल्हारीवेदमंत्र उच्चाराने आणि सुंदर आशा पारंपरिक गजनृत्य तालासुरात तोंडले गावात मल्हारी मार्तंड भैरव मंदिरात मूर्तीप्राण प्रतिष्ठा स्थापना करण्यात आली शेकडो ग्रामस्थांनी यावेळी भंडाऱ्याची उधळण करीत खंडोबा म्हाळसा बाणाईदेवी या नव्या मूर्तिची भव्य ग्रामप्रदक्षणा ही घातली हा सोहळा रविवारी प्रख्यात ज्योतिषतज्ञ पंडित प्रवीण राजगुरू गुरुजी यांच्या आणि जेजुरी खंडोबादेवता उपाध्य पुजारी श्लोक हरिश्चंद्रे हस्ते पार पडला तोंडल गावातील समस्त ग्रामस्थांनी आपल्या परिश्रमातून या मंदिराची निर्मिती केली असून शनिवार मध्यरात्री पासूनच पंडित राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली अच्युत गुरव गुरुजी, हनुमंत डोळे उपाध्य शैवब्राम्हण पुजारी यांनी वेदविधी सह धार्मिक कार्यक्रमाला आरंभ केला होता.

या करीत ग्रामस्थ वर्गातील सात जोडप्यानचे हस्ते होमहवन संकल्पही करण्यात आला, खंडोबा बाणाई म्हाळसा मूर्ती ग्रामप्रदक्षणा वेळी गावाकऱ्यांनी सडा रांगोळी आणि फटाक्याच्या अतिशबाजीत स्वागत केले तर चित्रपट निर्माते राजू बरकडे यांनी विशेष साह्यय केले.

# रामदास आठवले यांचा शिर्डी मतदारसंघावर दावा



**मुंबई:** रिपब्लिकन पक्षामुळे मागासवर्गीय मते मोठ्या प्रमाणात भारतीय जनता पक्ष आणि महायुतीकडे वळली आहेत. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत एक जागा आपल्या पक्षाला मिळावी अशी अपेक्षा व्यक्त करतानाच रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख (ए) आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी शिर्डीच्या मतदारसंघावर दावा सांगितला आहे.

यापूर्वी आपण दोन वेळा शिर्डी लोकसभा मतदारसंघातून निवडून गेलो आहोत. मागील निवडणुकीत आपल्याला पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र, या निवडणुकीत पुना शिर्डी मतदार संघातून रिंगणात उतरण्याचा आपला मानस आहे. त्यामुळे महायुतीने पर्यायाने राष्ट्रीय लोकशाही आघाडीने शिर्डीची जागा आपल्याला सोडावी, अशी मागणी आठवले यांनी केली आहे.

मागासवर्ग, अनुसूचित जाती जमाती यांची मते आत्तापर्यंत भाजप किंवा त्यांच्या मित्र पक्षालाही मिळत नव्हती. आपल्या रिपब्लिकन पक्षाच्या समावेशामुळे ही मते भाजप आणि महायुतीकडे वळली आहेत. भाजपा बरोबर केवळ शिवसेना शिंदे गट किंवा राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट आल्यामुळेच महायुती आकाराला आलेली नाही तर त्यात रिपब्लिकन पक्षाचाही सहभाग आहे. त्यामुळे महायुतीने आपल्या पक्षाला लोकसभेची एक जागा सोडावी. ही मागणी मान्य न झाल्यास आपल्याला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असेही आठवले म्हणाले.

बारामती लोकसभा मतदारसंघ हा आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांचा बालेकिल्ला होता. मात्र अजित पवार यांनी वेगळी चूल मांडल्यानंतर परिस्थिती बदलली आहे. मागील निवडणुकीत बारामती मतदारसंघातून महादेव जानकर हे अत्यंत थोड्या मतांनी पराभूत झाले. यावेळी मात्र शरद पवार गट आणि विशेषत: सुप्रिया सुळे यांच्यासाठी बारामतीची निवडणूक सोपी असणार नाही. कारण या निवडणुकीत महायुतीकडून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत, असेही आठवले यांनी सूचित केले.

# 'आयसीएआय' पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए अमृता कुलकर्णी

**पुणे :** दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) पुणे शाखेच्या अध्यक्षपदी सीए अमृता कुलकर्णी यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी सीए सचिन मिणियार, सचिवपदी सीए हृषीकेश बडवे, खजिनदारपदी सीए मोशमी शहा यांची, तर 'विकासा' या विद्यार्थी शाखेच्या अध्यक्षपदी सीए प्रणव आपटे यांची निवड झाली आहे. २०२४-२०२५ या वर्षासाठी नवीन कार्यकारी मंडळाची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष सीए अमृता कुलकर्णी यांनी मावळते अध्यक्ष सीए राजेश अग्रवाल यांच्याकडून पदभार स्वीकारला. कार्यकारिणी सदस्य म्हणून सीए राजेश अग्रवाल, सीए काशिनाथ पठारे, सीए प्रितेश मुनोत, सीए अजिंक्य रणदिवे काम पाहतील.

यावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए यशवंत कासार, सीए ऋता चितळे आदी उपस्थित होते. आयसीएआय पुणे शाखेच्या वतीने तसेच वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन केले. सीए राजेश अग्रवाल यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या कामांविषयी तसेच राबविलेल्या योजनांविषयी माहिती दिली. आयसीएआय पुणे शाखेला विभागीय स्तरावर प्रथम, तर राष्ट्रीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचे आणि 'विकासा' विद्यार्थी शाखेला केंद्रीय आणि विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सर्व सहकारी व कर्मचारी यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.



# मूळ भाजप व इतर पक्षातून आलेल्या नेत्यांची भाजप असे लवकरच दिसेल ?

**(अजित जगताप)**

**मुंबई** :दि: सध्या लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सामान्य कार्यकर्त्याला वैचारिक भूमिका घ्यावी लागते. ज्यांच्यासाठी पायात भिंगरी बांधून प्रचार केला. असे काही नेते आपला मूळचा राजकीय पक्ष सोडून भाजपवासी झालेले आहेत. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्याच्या प्रयत्नाचा शेवट हा प्रेमभंग झालेल्या प्रेमविरा सारखा झाला आहे. आता मूळचे भाजप व इतर पक्षातून भाजपमध्ये आलेल्या असे दोन गट लवकरच होतील ? अशी निष्ठावंत व प्रामाणिक पक्षाचे काम करणाऱ्या भाजपमधील एका गटाला शंका निर्माण झालेली आहे. कारण, आता भाजप मध्येच व्यक्तीकेंद्री राजकारणातून भाजपचे मूळ नेते सुद्धा दौरे आखत आहे. असा खुला आरोप होऊ लागलेला आहे.

भारतीय जनसंघाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांचे केडर हे भारतीय जनता पक्षाचा मूळ ढाचा आहे. ६ एप्रिल१९८० रोजी भाजपचे ज्येष्ठ नेते अटल बिहारी वाजपेयी व अयोध्या मधील श्रीराम मंदिरासाठी रथयात्रा काढणारे लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली होती . रूढीवाद , हिंदुत्व, हिंदू राष्ट्रवाद, आर्थिक उदारीकरण, एकात्मिक मानववाद या पाच विचारांवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा फडकत आहे. असा काहींनी समज करून घेतलेला आहे पण त्यामध्ये फारसं तथ्य नाही. पूर्वी ते विचार मांडले जात होते. आता असे विचार मांडणे भाजपमध्येच गुन्हा ठरलेला आहे.

खरं म्हणजे भारतीय जनता पक्षाची सत्ता १९९८-९९ साली आली होती. पंतप्रधानपदी अटल बिहारी वाजपेयी यांची वर्णी लागली तेव्हापासून आपल्या स्वतंत्र अस्तित्वासाठी भारतीय जनता पक्ष नेते व कार्यकर्ते प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. अलीकडच्या काळामध्ये लोकसभेमध्ये ५४३ पैकी ३०३व राज्यसभेमध्ये २४५ पैकी९३ खासदार हे भाजपचे आहेत. २०१४ पासून केंद्रात भाजपची सत्ता आहे .पण २०१९ रोजी झालेल्या निवडणुकीत ४८ पैकी २३ खासदार हे भाजपचे निवडून आलेले आहेत. युतीच्या काळात ४८ पैकी ४२ खासदार निवडून आले होते.

आता सध्या राजकीय गणित लोकशाहीच्या मानाने सुशिक्षित आलेले असून सर्वच पक्षात पडझड झालेली आहे. याला भविष्यात भाजपही अपवाद ठरणार नाही. हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे .कारण वैचारिक बांधिलकी व वैचारिक बैठक असलेले कार्यकर्ते हे पक्षाचा पाया असतो. आज त्या अर्थाने वैचारिक बैठक असलेले डाव्या व कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते सोडले तर अनेक कार्यकर्ते हे व्यवसायिक व बाजारू म्हणजे आठवड्याच्या बाजारला ग्राहकांना जे लागते त्या वस्तू घेऊन विक्री करणे व त्यातून नफा मिळवणे. या वृत्तीची आहे.

मूळ भाजप मधील जे कार्यकर्ते आहेत ते हिंदुत्वासाठी लढणारे कार्यकर्ते आहेत. आज संपूर्ण देशामध्ये नव्हे पण महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये प्रस्थापित व घराणेशाहीला पाठिंबा देणाऱ्या अनेक रथी महारथी लोकांच्या हातात भाजप गेलेले आहे. हे सांगण्यासाठी निष्ठावंतांना कमीपणा वाटत नाही. मुळातच मुळ भाजपमधील अनेक चेहरे हे अलीकडच्या राजकारणामध्ये जाणीवपूर्वक दूर ठेवलेले आहेत. आणि व्यक्तीनिष्ठ राजकारणाला आपली निष्ठा वाहणाऱ्या कार्यकर्त्यांची आज चलती आहे. शेवटी चलती का नाम गाडी ... बढती का नाम दाढी .....हे समीकरण झाले आहे.

१९८४ साली दोन खासदार असलेल्या भारतीय जनता पक्षाची वाढ व विस्तार करण्यामागे खूप मोठे योगदान हे काँग्रेस पक्षाचे अनेक नेत्यांचे आहेत. विशेषता काँग्रेसच्या सत्तेमध्ये पंतप्रधान नरसिंहराव यांनी रामानंद सागर यांच्या महाभारत व रामायण या दूरदर्शन मालिकेला मान्यता देऊन दुसऱ्या बाजूला भाजपचे नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या रथयात्रेला मूक संमती दिली होती. या सर्व गोष्टींचे नोंदणी आजही नोंद पटलावर आहे. मुळातच भारतीय जनता पक्ष धार्मिक व आध्यात्मिक आणि मूलगामी बदल न करता मूळचा साचा म्हणजे पांचाजन्य जे पचन तेवढेच खायचे व जे आवडत नाही त्याला हात लावायचा नाही. ही चांगली व आरोग्यास चांगली साथ देणारे विचार आहेत .

राजकारणामध्ये कोणीही कोणाचा शत्रू अथवा मित्र नसतो. त्यामुळे आपल्या सोयीने राजकारण करून आपण जनतेच्या विकासासाठी पक्ष बदलला असं निर्लज्ज पणाने सांगून आपला स्वार्थी हेतू कुणाला कळू नये. असे मुखवटे धारण करायचे आणि पुन्हा आपला चेहरा हा सुंदर असल्याचा देखावा निर्माण करण्यासाठी जाहिरात बाजी करायची हे आता सर्वांनाच पत्नी पडलेले आहे. त्यामुळे भविष्यात भाजपमधील मूळचे विचार सांगणारे कार्यकर्ते व इतर पक्षातून आलेल्या कार्यकर्त्यांची दुबळी लवकरच राजकारणात दिसल्यास आश्चर्य वाटणार नाही. शेवटी परिवर्तन संसार का नियम आहे. त्याला भारतीय जनता पक्ष अपवाद नाही. हे ठळक दिसू लागलेले आहे.

# म.गांधी-नेहरु विचारधारा संपवण्यासाठी भाजपाकडून पंडित नेहरुंवर सातत्याने टीका : रमेश चेन्नीथला

## लोणावळ्यातील दोन दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबीराची सांगता

**लोणावळा :** नरेंद्र मोदी व भाजपा लोकशाहीला संपवण्यासाठी बसले आहेत. लोकसभा निवडणुकीत मोदी पुन्हा सत्तेत आले तर अनेकांना जेलमध्ये जावे लागले. कारण ते लोकशाही, संविधान काहीच मानत नाहीत. आता आपल्यासमोर करा किंवा मरा अशी परिस्थिती आहे.

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर भाजपा व नरेंद्र मोदी सातत्याने टीका करत असतात त्यामागे गांधी-नेहरुंची विचारधारा संपवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे असे प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले आहेत.

लोणावळ्यातील दोन दिवसाच्या राज्यस्तरीय शिबिरात समारोपाचे मार्गदर्शन करताना चेन्नीथला पुढे म्हणाले की, लोकसभेच्या निवडणुकीसाठी फार कमी वेळ राहिला आहे. आता निवडणुका सायंटिफिक पद्धतीने लढवल्या पाहिजेत यावर चर्चा झाली आहे. बुथ मॅनेजमेंट हे सर्वात महत्वाचे आहे.

इंडिया आघाडीला सत्तेत आणण्यासाठी काम केले पाहिजे आणि राज्यातून ४८ जागा जिंकण्याचे लक्ष ठेवा. तसेच पक्षात शिस्त असली पाहिजे. कोणी काहीही बोलावे हे चालणार नाही. एनएसयुआय, युवक काँग्रेस, फ्रंटल सेल त्यांच्याही प्रदेश स्तरावर बैठका झाल्या पाहिजेत.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, लोणावळ्यात दोन दिवसाच्या शिबिरातून चांगले बौद्धीक व वैचारिक मंथन झालेले आहे. काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान बाळगून काम करा. काँग्रेस पक्ष संपूर्ण राज्यात एकजूट असला पाहिजे. सर्व सेल, फ्रंटल संघटना सर्वांनी सोबत असले पाहिजे. पक्षाच्या अजेंड्यावरच सर्वांनी काम केले पाहिजे व काँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून पक्षाच्या अजेंड्यानुसारच काम करा आणि लोकसभेची लढाई जिंकायची आहे हा संकल्प घेऊनच जा. आता आपल्याकडे वेळ नाही, युद्ध पातळीवर काम करायचे आहे.

भाजपा कसे खोटे बोलत आहे, जनतेची फसवणूक करत आहे हे लोकांमध्ये जाऊन सांगा, कुठेही कमी पडू नका. आघाडीला विजयी करुन भाजपाचा पराभव करावा लागणार आहे. वातावरण काँग्रेस व मविआच्या बाजूने आहे. नरेंद्र मोदींच्या सत्तेचे दरवाजे महाराष्ट्र बंद करु शकतो, हे लक्षात घ्या असे सांगत शेवटी नाना पटोले यांनी तुम मुझे आंधीओंका डर बताते हो, मैं तो तुफानों से बगावत कर के आया हूँ. हा शेर ऐकवून भाषण संपवले.

काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, काँग्रेसची पिछेहाट झालेली नाही तर तत्वज्ञानाची पिछेहाट होत आहे, शिबीरे कमी झाली म्हणून विचाराची पिछेहाट झाली आहे. आपल्याकडे परंपरा, तत्त्वज्ञान, विचार, काँग्रेस सरकारने केलेले काम आहे, काँग्रेसने देशासाठी बलिदान दिले आहे आपण काँग्रेस पक्षाचे आहोत याचा अभिमान असला पाहिजे.




**सध्या व्यावसायिक राजकारण झाले आहेत, सत्ता आली की तिकडे जायचे, पुन्हा काँग्रेसची सत्ता आली की पुन्हा काँग्रेसमध्ये यायचे. हे चालणार नाही अशी भूमिका घेतली पाहिजे. सत्तेत जायचे, पैसे कमावायचे असले धंदेवाईक राजकारण चालू देऊ नका. अशांना काँग्रेस पक्षात स्थान देऊ नका. अशा धंदेवाईक राजकारण्यांना जनतने धडा शिकवला पाहिजे. राहुल गांधी यांचे कष्ट वाया जाणार नाहीत, भारत जोडो यात्रेतून सकारात्मक उर्जा निर्माण होत आहे. आपणही जनतेकडे गेले पाहिजे, चांगले काम केले तर महाविकास आघाडी लोकसभेच्या ३८ जागांपेक्षा जास्त जिंकू शकते.**

लोकसभेच्या निवडणुकीसाठी आपल्याकडे फारसा वेळ नाही. आघाडी करून निवडणुका लढवल्या जाणार आहोत. उमेदवार कोणीही असला तरी लक्ष्य एकच आहे ते म्हणजे भाजपा व नरेंद्र मोदी सत्तेवर राहता कामा नये ते देशासाठी हिताचे नाही.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यावेळी म्हणाले की, पंतप्रधान मोदी सातत्याने भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाची असल्याचे सांगत असतात व स्वातंत्र्याला १०० वर्षे होतील त्यावेळी २०४७ साली भारत विकसीत राष्ट्र होईल. भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकाची झालेली आहे परंतु नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्थेची जी गती राहिली त्याच्या तुलनेत डॉ. मनमोहनसिंह सरकारच्या काळातील गती जास्त होती, त्याच गतीने वाढ झाली असती तर भारत आजच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाला असता. युपीए काळात अर्थव्यवस्थेचा विस्तार १८३ टक्के झाला तर मोदी काळात तो १०३ टक्के झाला. अर्थव्यवस्थेची पिछेहाट होण्यामागे नोटबंदी, जीएसटीची अंमलबजावणी, अचानक लावलेला लॉकडाऊन, शेतकऱ्यांविरोधात पुकारलेले युद्ध आणि भ्रष्टाचार या पाच मुद्द्यांमुळे अर्थव्यवस्थेची गती मंदावली.

२०४७ साली भारत विकसीत राष्ट्र होणार असे स्वप्न दाखवले जात आहे पण त्यासाठी दरडोई उत्पन वाढले पाहिजे. ज्या देशाचे दरडोई उत्पन्न जास्त ते समृद्ध राष्ट्र. त्यासाठी दरडोई उत्पन्न १३ हजार ८४५ डॉलर असावे लागते. सध्या भारताचे दरडोई उत्पन्न २८०० डॉलर आहे. आणि त्यासाठी १० टक्के दराने अर्थव्यवस्था वाढली पाहिचे पण मोदी सरकारच्या काळात अर्थव्यवस्थेचा दर ६.०-६.२५ टक्के आहे.म्हणजे 'बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी' अशी मोदींची अवस्था आहे, असे चव्हाण म्हणाले.

शिबिराची सांगता झाल्यानंतर नाना पटोले यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले, शिबिराची माहिती दिल्यानंतर पटोले म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी बोलावण्यात आलेल्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षणाचा कायदा असा करावा लागेल की तो कोर्टातही टिकला पाहिजे. देवेंद्र फडणविसांनी २०१८ साली असाच कायदा केला पण तो पुढे कोर्टात टिकला नाही.